महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

रविवार ◆०३ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## एसटी आता करणार किरकोळ इंधन विक्री

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने केंद्र व राज्य सरकारच्या व्यावसायिक भागिदारीतून एसटी महामंडळ राज्यभरात स्वतःच्या जागेवर विविध ठिकाणी व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्रीचे रिटेल विक्री (किरकोळ विक्री) पंप सुरू करीत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. अशा परिस्थितीमध्ये केवळ प्रवासी तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या महसुलावर अवलंबून राहणे श्रेयस्कर नाही. त्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. गेली ७० वर्षपेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल कंपन्यांच्या कडून डिझेल इंधन विकत घेत आहे. सध्या २५१ ठिकाणी एसटीच्या स्वतः च्या जागेवर पेट्रोल पंप उभारले असून या द्वारे केवळ एसटीच्या बसेस साठी डिझेल इंधनाचे वितरण होते. अर्थात , पेट्रोल पंप चालवणे आणि त्याचे देखभाल करण्याचा उत्तम अनुभव एसटी महामंडळाच्या पाठीशी आहे. त्यामुळे भविष्यात केंद्र सरकारचे सार्वजनिक उपक्रम असलेल्या इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या ऑइल विक्री करणाऱ्या कंपन्यांशी व्यावसायिक करार करून सर्वसामान्य ग्राहकांसाठी पेट्रोल आणि डिझेल व तत्सम इंधन विक्री करणारे पंप उभा करणे प्रस्तावित आहे.



**एसटी महामंडळाचे केवळ इंधन विक्रीच नाही तर रिटेल शॉप देखील उभारले जाणार आहेत. त्यामुळे येथे इतर व्यवसायाला देखील पूरक संधी उपलब्ध होईल! यातून एसटी महामंडळाला सार्वजनिक भागिदारी तुन चांगला महसूल देखील मिळू शकतो.**

**मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. अशा परिस्थितीमध्ये केवळ प्रवासी तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या महसुलावर अवलंबून राहणे श्रेयस्कर नाही. त्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे.**

असे पेट्रोल पंप हे रस्त्यालगत व व्यावसायीक दृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यभरातील एसटी महामंडळाच्या स्वतःच्या ज्या जागा आहेत, त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून अशा २५ बाय ३० मीटर जागा निश्चित करण्यात येत आहेत. या ठिकाणी एसटी महामंडळाचे केवळ इंधन विक्रीच नाही तर रिटेल शॉप देखील उभारले जाणार आहेत. त्यामुळे येथे इतर व्यवसायाला देखील पूरक संधी उपलब्ध होईल! यातून एसटी महामंडळाला सार्वजनिक भागिदारी तुन चांगला महसूल देखील मिळू शकतो.

मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या केंद सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्री करणाऱ्या कंपन्यांशी राज्य शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेले एस टी महामंडळाशी व्यावसायिक भागीदारीचा करार करण्यात येईल! अर्थात , हा करार एका अर्थाने केंद्र आणि राज्य शासनाच्या दरम्यान होत असल्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाच्या वितरणामध्ये पारदर्शकता राहील.

यासाठी संबंधित कंपन्यांनी राज्यभरात एस टी महामंडळाच्या सर्व जागांचे व्यावसायिक सर्वेक्षण करून २५१ ठिकाणी असलेल्या पेट्रोल पंपाचे एसटी महामंडळाच्या स्वतःच्या नव्या व्यवसायिक दृष्ट्या मोक्याच्या २५ बाय ३० मीटर जागेवर स्थलांतर केले जाईल, जिथे एस टी महामंडळाला स्वतःच्या बसेस साठी इंधन भरण्याची सोय असेल याचबरोबर सर्वसामान्य ग्राहकाला देखील किरकोळ इंधन विक्री करणे शक्य होईल.अशा पद्धतीचे ' पेट्रो -मोटेल हब " उभा करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

### गोकुळाष्टमी निमित्त

## राज्यातील १.५० लाख गोविंदांना विमा संरक्षण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गोकुळाष्टमी अर्थात दहिहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अत्यंत महत्त्वाचा सण असून या उत्सवात राज्यातील हजारोत युवक-युवती "गोविंदा" म्हणून थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सहभागी होतात. मात्र गेल्या काही वर्षांत सरावादरम्यान आणि प्रत्यक्ष उत्सवाच्या दिवशी अनेक अपघात घडले असून, अनेक गोविंदांना दुखापतींचा सामना करावा लागतो. गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विमा संरक्षण मिळावे म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यंदा राज्यातील सुमारे १.५० लाख गोविंदांना "गोविंदा समन्वय समिती (महा.)" या नियोजन समितीच्या माध्यमातून "ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी" चे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी गोविंदांसाठी आवश्यक असलेली विमा कवच योजना तातडीने मंजूर करून दिल्याबद्दल राज्यभरातील लाखो गोविंदांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.



गेल्या वर्षी १.२५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र, काही गोविंदा त्यापासून वंचित राहिले. यंदा ही त्रुटी दूर करत विमा कवचाची मर्यादा वाढवून १.५० लाख गोविंदांपर्यंत हे संरक्षण पोहोचवले जाणार आहे.दहीहंडी 2025 मध्ये गोविंदांसाठी विमा संरक्षण – शास निर्णय निर्गमित यावर्षी राज्यभरातील अंदाजे १,५०,००० गोविंदांना विमा संरक्षण प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत "दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे.महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्यामार्फत आवश्यक कागदपत्रे सादर करून विमा रकमेचा खर्च शासनाकडून अदा केला जाणार आहे. क्रिडा व युवक सेवा विभाग, मुंबई यांना यासंदर्भात सुसंवाद आणि आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एकूण रु. १,१२,५०,०००/- (एक कोटी बारा लाख पन्नास हजार रुपये) इतक्या रकमेचा विमा प्रस्ताव अंतिम करण्यात आला आहे. त्यानुसार उप सचिव (सुनील पांढरे) यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या शासन आदेशानुसार संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही करून गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी ही योजना तत्काळ राबवावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## कासगाव - कामोठे नवीन रेल्वे मार्गाची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रातील कर्जत, बदलापूर, अंबरनाथ, नेरळ परिसर चौथी मुंबई म्हणून विकसित होत आहे. या भागातील बहुतांशी नागरिक नोकरी, व्यवसायासाठी मुंबई, नवी मुंबई, पनवेलकडे जात आहे. या वाढत्या प्रवाशांचा विचार करून बदलापूर-चामटोली (कासगाव), वांगणी ते मोर्बे, नवी मुंबई (कामोठे) रेल्वे मार्गाचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आणि नियोजनकार राम पातकर यांनी केंद्रीय रस्ते आणि राज्यमार्ग परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.



हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आला तर बदलापूर, अंबरनाथ, कर्जत, नेरळ, वांगणी परिसरातून नवी मुंबई, पनवेलकडे जाणाऱ्या प्रवाशांचा कल्याण, ठाणे रेल्वे मार्गावरील प्रवासी भार कमी होण्यास मदत होणार आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरात कर्जत, बदलापूर, अंबरनाथ परिसरातील नागरिकांना जायचे असेल तर त्यांना कल्याण, ठाणे रेल्वे मार्ग आणि काटई शिळफाटा मार्गा शिवाय अन्य पर्याय नाही. हा प्रवाशांचा वाढता भार विचारात घेऊन बदलापूर, वांगणी ते नवी मुंबई (कामोठे) रेल्वे मार्गाचा प्राधान्याने विचार व्हावा यासाठी आपण प्रयत्न करावेत, असे पातकर यांनी सांगितले.

### रेल्वे मंत्रालय हालचाली

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी माजी नगराध्यक्ष राम पातकर यांच्या पत्राचा संदर्भ घेऊन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहिले. बदलापूर, कर्जत, अंबरनाथ परिसरात झपाट्याने होत असलेल्या नागरीकरणाचा विचार करून या भागात बदलापूर ते वांगणी दरम्यान कासगाव येथे नवीन रेल्वे स्थानक उभारणी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने चाचपणी करावी. तसेच, बदलापूर कासगाव ते मोर्बे ते कामोठे या नवीन रेल्व मार्गाचा प्राधान्याने विचार करावा, असे सूचित केले आहे.

**माजी नगराध्यक्ष राम पातकर यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र**

### बदलापूर टर्मिनस मागणी

कल्याण रेल्वे स्थानकातील प्रवासी, मेल, एक्सप्रेस, लोकलचा वाढता भार विचारात घेऊन बदलापूर रेल्वे स्थानकाला रेल्वे टर्मिनस म्हणून जाहीर करावे. बदलापूर रेल्वे रेल्वे स्थानकात सिंहगड, डेक्कन, इंटरसिटी एक्सप्रेसना थांबा देण्यात यावा. या रेल्वे स्थानकातील फलाटांची लांबी वाढविण्यात यावी. कर्जत, अंबरनाथ, बदलापूर परिसरातील अनेक विद्यार्थी, नोकरदार नोकरी, शिक्षणासाठी पुणे परिसरात जातात. त्यांना या सुविधांचा लाभ होणार आहे, असे पातकर यांच्या पत्रावरून केंद्रीय मंत्री गडकरी यांनी रेल्वे मंत्री वैष्णव यांना कळविले आहे.

याशिवाय कर्जत, पनवेल, मुंबई लोकल सेवा सुरू करावी. बदलापूर ते पुणे, टिटवाळा ते नाशिक मेमू लोकल सेवा सुरू करावयात. उल्हास नदीतून बदलापूर ते कल्याण खाडीतून जलवाहतूक सुरू करावी, अशाही मागण्यात करण्यात आल्या आहेत.

## जीवनदीपच्या परिसरात पार पडले वृक्षारोपण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, वाढती जागतिक तापमान वाढ व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जीवनदीप महाविद्यालयाच्या परिसरामध्ये पर्यावरणाला पोषक अशा ५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी ठीक १०.३० मिनिटांनी महाविद्यालयाच्या परिसरात हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवण्यात आला. स्वयंसेवकांनी उत्साहाने यात सहभाग घेतला व आपली समाजाप्रती असलेली बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला. सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. के. बी .कोरे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ , उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे ,स्मिता घोडविंदे, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश धनगर , प्रा. धनश्री नाईक व NSS स्वयंसेवक यांच्या सर्वांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.













# गीतासार

## अध्याय १८
## मोक्षसंन्यासयोगः

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना। करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥१८-१८॥

ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या तीन प्रकारच्या कर्माच्या प्रेरणा आहेत. आणि कर्ता, करण तसेच क्रिया हे तीन प्रकारचे कर्मसंग्रह आहेत. ॥१८-१८॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः। प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥१८-१९॥

गुणांची संख्या सांगणाऱ्या शास्त्रात ज्ञान, कर्म आणि कर्ता हे गुणांच्या भेदाने तीन-तीन प्रकारचेच सांगितले आहेत. तेही तू माझ्याकडून नीट ऐक. ॥१८-१९॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते। अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥१८-२०॥

ज्या ज्ञानामुळे माणूस निरनिराळ्या सर्व भूतांमध्ये एक अविनाशी परमात्मभाव विभागरहित समभावाने भरून राहिला आहे, असे पाहतो, ते ज्ञान तू सात्त्विक आहे, असे जाण. ॥१८-२०॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान्। वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥१८-२१॥

परंतु ज्या ज्ञानाने मनुष्य सर्व भूतांमध्ये भिन्न भिन्न प्रकारांचे अनेक भाव वेगवेगळे जाणतो, ते ज्ञान तू राजस जाण. ॥१८-२१॥

## रेसिपी
# वालाचं बिरडं



**साहित्य**

वालाचं बिरडं, मोड आलेले वाल - 2 वाट्या, कांदा - 1 कप, टोमॅटो - 1/2 कप, आलं-लसूण पेस्ट - 1 चमचा, हळद - 1/2 चमचा, लाल तिखट - 2 चमचे, गरम मसाला - 1 चमचा, कांदा-खोबऱ्याचे वाटण - 1 कप, कोथिंबीर - 1 चमचा, तेल, मीठ, पाणी

**कृती**

सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात तेल घेऊन त्यात चिरलेला कांदा परतून घ्यावा. कांदा परतल्यावर त्यात आलं-लसणाची पेस्ट घालावी. यानंतर त्यात चिरलेला टोमॅटो, हळद, लाल तिखट, गरम मसाला घालावा. फोडणीला तेल सुटल्यावर त्यात मोड आलेले वाल घालावेत. चवीनुसार मीठ घालावे. भांड्यावर झाकण ठेवून वाल हलकचे शिजवून घ्यावे. एक उकळी आणावी. गरजेनुसार, पाणी घालावे. वाल शिजत आल्यावर कांदा-खोबऱ्याचे वाटण घालावे, पुन्हा एक उकळी आणावी. सगळयात शेवटी तयार झालेल्या वालाच्या बिरड्यावर चिरलेली कोथिंबीर भुरभुरवून घ्यावी. अशा पद्धतीने तांदळाच्या भाकरीसोबत गरमागरमा कोकणी पद्धतीचे स्पेशल वालांच बिरडं सर्व्ह करावे.

# प्रेम वरदान

**गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण बुद्रुक खालापूर रायगड**

प्रेम वरदान
प्रेम वरदान स्मर सदा

वरील नाट्यपदातील एक ओळ मानवाला अंतर्मुख करणारी आहे मानवाला दिलेले हे वरदानाचे सोने किंवा माती करण्याचे मानवाच्या हातात आहे मराठीत प्रेम म्हणतात अडीच अक्षर प्रेमाचे तर हिंदीत प्यार म्हणतात ढाई अक्षर प्यार के असे म्हटले जाते प्रेमात अडीच अक्षरात प्रे ही जोडगोळी आहे म्हणजेच मिठी आहे त्यात प व र ही अक्षरे आहेत यात प अर्ध अक्षर तर र् पूर्ण अक्षर यात पूर्ण कोण व अर्धे कोण असा प्रश्न प्रेम व प्रेमिकेत केला तर तो मुद्दा वादाचा होऊ शकतो. तसेच हिंदी प्यार हा प्रेमासाठी शब्द आहे यात ही प व य ही जोडगोळी आहे त्यामुळे येथेही वादाचा मुद्दा होऊ शकतो. प्रेमात शेवटचे अक्षर म आहे. सप्तसुरांच्या बाबतीत म हा तीव्र होतो तर तसाच राहतो येथेच खडाष्टकाची सुरुवात होते. त्यामानाने प्यार मधील शेवटचे अक्षर र आहे. सप्तसुरात र हा कोमल होतो नाहीतर तसाच राहतो प्यार मधील प्रेमी जुळून घेतात.

आपल्या पतिवर निश्चीम प्रेम श्रद्धा पतीबद्दल पराकोटचा आदर असतो अशा स्त्रिया प्रतिवता म्हणून ओळखल्या जातात त्यामध्ये अहिल्या सीता तारा द्रोपदी व मंदोदरी या पाच महान प्रतिवता होत्या त्यांचे साठी एक सुभाषित आहे.

अहिल्या द्रौपदी सीता तारा तथा मंदोदरी पंचकन्यास स्मरे नित्यम सर्व पापनाशनाम

पंचकन्यांची महानता दाखवण्यासाठी महान साहित्यिक गडकरी यांनी पुण्य प्रभाव नाटकात वसुंधरा ही महान पतिव्रता सादर केली. वृंदावन वसुंधरेची प्रतिव्रता हरण करण्याचा प्रयत्न केला वसुंधरा घाबरली नाही तिला तिच्या पती प्रेमावर विश्वास होता आपल्या अढळ श्रद्धेवर ठाम राहून वृंदावनाला सुनावले प्रतिव्रतांची पुण्याई पातकी पुरुषाला परमेश्वरा प्रत पोहोचविते. पुढे जाऊन असेही म्हणते प्रतिव्रतांचे पुण्याई पुढे पाय पांगळे पडते या तिच्या निश्चयाचा परिणाम वृंदावनावर होतो. राक्षसी वृंदावनाचे रूपांतर चांगल्या माणसात होते ही आहे प्रतिभातांची ताकद. आपल्या भारतातील कित्येक जोडपी 50 ते 60 वर्षापर्यंत सुखाने संसार करतात हे आपापसातील प्रेमामुळे शक्य आहे हाच भारतीय संस्कृतीचा कणा आहे आता Love बद्दल पाहूया हा. ही शब्द प्रेमासाठीच वापरला जातो परंतु आग्लभाषी आहे पाश्चात्त्य संस्कृतीचा पाईक लव्हमध्ये जागोजागी प्रेमाचे प्रदर्शन पाहावयास मिळते. त्याला खरे प्रेम म्हणावे की केवळ शारीरिक भुकेसाठी ते जवळ येत असावे असे वाटते. प्रेम म्हणजे उघड्यावर दाखवणारी कृती निश्चित नाही जगातील इतर संस्कृतीत पुरुष आणि स्त्री ही लग्न बंधनात पडत नाहीत आणि पडलेच तर घटस्फोटाचे प्रमाण महाभयंकर आहे त्यांचा फक्त आणि फक्त लव्ह वरच विश्वास असतो वातावरणातील बदलाप्रमाणे त्यांचे विचार बदलत असतात याच कारणाने साऱ्या जगाचे लक्ष भारतीय संस्कृतीकडे लागलेले असते भारतीय संस्कृतीचा परंपरांचा अभ्यास करण्यासाठी साऱ्या जगातील पुरुष व स्त्रीला भारताला भेट देतात व आपल्या कुटुंब पद्धतीचे भरभरून तारीफ करतात यासाठी नाट्यगीतातील एक ओळ

प्रेम सुगंधित करी संसारा

प्रेम हे दोन पुरुष दोन स्त्रिया पुरुष व स्त्रिया डोळ्यात होते तसेच आपण व आपले नातेवाईक दोन समाजात राज्या राज्यात दोन देशात प्रेमाची उदाहरणे पाहावयास मिळतात प्रेमाच्या परमोच्च शिखरावर असणाऱ्या अमर प्रेमाच्या जोड्या आपल्या इतिहासात पहावयास मिळतात त्यामध्ये लैला मजनू हिरा रांजा बाजीराव मस्तानी कच देवयानी यासारख्या जोड्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या जोड्या आहेत. खऱ्या प्रेमात कशाचीही आसक्ती व लोभ नसते. प्रेम प्रेम आणि प्रेमच असते .यासाठी नाट्यगीतातील एक ओळ

खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनी

प्रेम तरी किती प्रकारचे असते? पहा ना निखळ प्रेम, निस्सीम प्रेम, गाढव प्रेम, आंधळे प्रेम, शारीरिक प्रेम, वासनांद प्रेम, सात्विक प्रेम, आतल्या गाठीचे प्रेम, वरवरचे प्रेम, लाघवी प्रेम, फसवे प्रेम, प्रेमाचे अनेक प्रकार आहेत. आपल्यावर कोणाचे कोणत्या प्रकारचे प्रेम आहे आपणास कळणार सुद्धा नाही. आपण या प्रेमाच्या जाळ्यात अडकत नाही ना याचा आपण विचार करणे गरजेचे आहे. प्रेम कळण्यास फारच उशीर झाला तर आपण या संसाररूपी सागरात बुडाल्याशिवाय राहणार नाही. आपण एखाद्यावर प्रेम करीत असल्यास हिंदीत म्हटले आहे प्यार किया तो डरना क्या? हे गीत ओळी आहेत. या प्रेमामध्येही आपली फसगत होऊ शकते. आज आपण अशी उदाहरणे पदोपदी पहात आहोत प्रेमावरच नाती टिकतात हेही खर आहे त्यामध्येही प्रेमाची परीक्षा आहेच! प्रेमासाठी परमपूज्य साने गुरुजी म्हणतात

"खरा तो एकची धर्म
जगाला प्रेम अर्पावे"

या ठिकाणी साने गुरुजी प्रेम करावे असे म्हणत नाही तर ते अर्पावे असे म्हणतात. त्यामुळे प्रेमात फजगत होत नाही. जसे की माऊली आपल्या मुलावर जणू प्रेम अर्पिते अगदी कोणत्याही फळाची अपेक्षा न करता निरपेक्ष प्रेम करते; तिच्यापासून आपल्याला कोणत्याही प्रकारचा धोका नाही काळ्या दगडावरची पांढरी रेघ जणू !तरीही प्रेम करताना प्रत्येक वेळी चुकीवरच नेहमी बोट ठेवू नये. चांगल्या वरचा आपला विश्वास उडून जाईल म्हणतात" ना साधूचे पाहू नये कुळ आणि नदीचे पाहूनही मूळ" असे केल्याने आपल्यात नकारात्मक भावना निर्माण होऊ शकते. आपल्याला अनेक नाती टिकवायचे असतात हाताची बोटे काही सारखी नसतात. सर्वांना एकाच तराजूत तोलले तर चालणार नाही आपल्याला आपली नाती टिकवताना तडजोड करावयाची असते. घराघरातील ते राष्ट्राराष्ट्रा पर्यंतची मैत्री प्रेम टिकवायचे असते. प्रेमावरच नाती टिकतात. देश विदेशात सलोखाचे संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे.देश देशात कुरबुरी चालू असेल तर आज जी विश्वामध्ये उलथापलथ पहावयास मिळत आहे ती तिसऱ्या महायुद्धाची नांदी तर नाही ना? आज असेच वाटत असावे सर्वजण याच युद्धाच्या दडपणाखाली जगत आहात हे आजच्या घडीला नको आहे यासाठी नाट्यगीताची ओळ

प्रेम सुगंधित करी संसारा (जगताला) असे आहे हे प्रेम की त्यावर कितीही बोललो तरी संपणार नाही.

मानवा जागृत हो
तू जपून टाक पाऊल जरा
जीवनातल्या मुसाफिरा

# टाटा संचलित कौशल्यवर्धन केंद्राच्या माध्यमातून युवकांसाठी उज्वल रोजगाराच्या संधी निर्माण होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्य शासन व टाटा समूह उद्योग यांच्यावतीने रोहा येथे कौशल्यवर्धन केंद्र शिक्षणाचे नवे दालन उभारण्यात येत आहे. हा अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून मे 2026 पर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल. आजच्या घडीला जवळपास सर्वच क्षेत्रात AI चा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं आगामी काळात आवश्यक ठरणार आहे. या केंद्रातून मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ जिल्ह्यातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी तसेच उद्योग व्यावसायिकांनी लाभ घ्यावा, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केले.

टाटा, एमआयडीसी व रोहा नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आणि खा. सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने रोहा येथील टाटा संचलित कौशल्यवर्धन केंद्राचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा शल्य चिकित्सक निशिकांत पाटील, सुशिल कुमार जागतिक प्रमुख शासकीय प्रकल्प आणि कौशल्य विकास टाटा टेक्नॉलॉजी लि.पुणे, प्रितम गंजेवार, प्रकल्प समन्वय टाटा टेक्नॉलॉजी लि.पुणे आदि उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या प्रकल्पामुळे रायगड जिल्ह्यातील विद्यार्थी तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना या प्रकल्पाचा फायदा होणार असून, त्याद्वारे अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रशिक्षण केंद्रातून दरवर्षी 3 हजार विद्यार्थी प्रशिक्षण घेवून कोर्स पूर्ण करणार आहेत. टाटा समूह उद्योग म्हणजे विश्वास असे समीकरणं आहे. त्यामुळे हे काम विहित वेळेत पूर्ण होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

रोहा तालुका म्हणजे भातशेतीसाठी प्रसिध्द असलेला तालुका असून या तालुक्यातील सांस्कृतिक, अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभलेला आहे. या प्रशिक्षण केंद्रामुळे उद्योग क्षेत्राला प्रशिक्षित कुशल नेतृत्व मिळणार आहे. टाटा समूहाचे या केंद्रासाठी मोठे योगदान असून टप्प्याटप्याने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. या माध्यमातून राज्यभर तांत्रिक शिक्षण आणि नैसर्गिक कौशल्यातून युवकांसाठी उज्वल रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. स्थानिकांना आपल्या गावातच नोकरी मिळणार आहे असे ही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी सांगितले की, रोहा एमआयडीसी ही वैशिष्ट्यपूर्ण असून येथील उद्योग स्थलांतरित होण्याचे प्रमाण कमी आहे. टाटा समुहाच्या मदतीने रोहा येथे हा प्रकल्प येत आहे ही आनंदाची गोष्ट असून उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याहस्ते या केंद्राचे भूमिपूजन झाल्याने मर्यादित वेळेत दर्जेदार इमारतीचे काम पूर्ण होईल असा विश्वास कु.तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पामुळे रोहा व रायगड शहरातील विद्यार्थी तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सदर प्रकल्पाचा फायदा होणार असून, त्याद्वारे अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच चांगल्या दर्जाच्या नोकरीची संधी वाढवण्यासाठी उच्चसत्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, विद्यार्थ्यांना, उद्योग व्यावसायिकांना नवकल्पना आणि कौशल्य विकास याद्वारे उद्योगात कुशल संसाधने आणि उद्योजकता निर्माण करणे या प्रमुख उद्दिष्टना चालना मिळणार असल्याचेही मंत्री कु तटकरे यांनी सांगितले. रोहा, महाड आणि रसायनी येथे राज्य विमा कामगार हॉस्पिटल प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आले आहेत. याबाबत पाठपुरावा होणे आवश्यक आहे. राज्यातील रोहा अष्टमी एकमेव नगर परिषदेकडे हक्काची ब्लड बँक आहे. या ब्लड बँकेचे अत्याधुनिकरण करण्यात येत असल्याचेही कु. तटकरे यांनी सांगितले.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, जिल्ह्यातील रोहा येथील कौशल्यवर्धन केंद्र हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणाचा लाभ जिल्ह्यातील विद्यार्थी तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांनी घ्यावा. या प्रकल्पामध्ये टाटा समूहाचे मोठे योगदान असून हे काम ते सहा महिन्यांमध्ये पूर्ण करणार आहेत. या प्रशिक्षण केंद्रातून व्यावसायाभिमूख प्रशिक्षण देण्याचे शासनाचे धोरण आहे. याकरिता जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनीही याचा लाभ घ्यावा असे आवाहन खा. तटकरे यांनी केले.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्ह्यातील ज्या गावांचं गावठाण भूमापन होऊन नकाशे व मालमत्ता पत्रक (Property Card) तयार करण्यात आलेलं आहे. सनदा तयार झालेलं आहे, अशा गावांपैकी प्रातिनिधिक स्वरूपात पाच लाभार्थ्यांना स्वामीत्व सनदेचं वाटप करण्यात आलं. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 'सर्वांसाठी घरे' या योजनेनुसार अतिक्रमणं नियमित करून सनदेचं वाटप करण्यात आलं.

या कार्याक्रमाला उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, मुख्याधिकारी तथा प्रशासक रोहा नगर परिषद, अजयकुमार एढके, मुख्य अभियंता, म.औ.वि.महामंडळ प्रकाश चव्हाण, रोहा नगर परिषदेतील नगसेवक, नगरसेविका, विविध शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# 'विकसित भारत' घडविण्यासाठी देश नशामुक्त होणे गरजेचे

**– समीर वानखेडे, माजी संचालक, नार्कोटीक कंट्रोल ब्युरो, मुंबई विभाग**




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण विकास फाऊंडेशन व यंग ईंडीया कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.०२ ऑगस्ट २०२५ रोजी 'मिशन नशामुक्त कल्याण' या कार्यक्रमात समीर वानखेडे, माजी संचालक नार्कोटीक्स कंट्रोल ब्युरो मुंबई विभाग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आज नार्कोटीक्स आतंकवाद हा आपल्या देशाला भेडसावणारा ज्वलंत प्रश्न निर्माण झालेला आहे. शेजारील शत्रु राष्ट्र हस्तकांच्या मदतीने आपल्या देशात अफिम, चरस, गांजा, हेरॉईन हे मादक पदार्थ पाठवितात व त्यातुन येणाऱ्या पैशाने आपल्याच देशात आतंकवाद पसरवित आहेत. आज भारताची ओळख तरूणांचा देश म्हणून ओळखला जातो. आणी हाच तरूण जर नशेच्या आहारी गेला तर भारताचे भवितव्य धोक्यात येईल. यामुळेच या शेजारील शत्रु राष्ट्रांचा देशातील तरूणांना खिळखिळा करण्याचा प्रयत्न असतो. आणी त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग होणे गरजेचे आहे. आज पानपट्यांवरही 'म्याव म्याव' असे मागितले की एमडी हा मादक पदार्थ मिळतो. पब्ज, रेव्ह पार्ट्यांमध्ये 'हायड्रोपोनिक व्हिट' म्हणजे गांजा सर्रास उपलब्ध असतो. आणी या मादक पदार्थांच्या हस्तकांचे ध्येय हे शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी असतात. तेव्हा जेव्हा कोणाला अशा घटनांचा सुगावा लागला तर ॲन्टीनार्कोटीक विभागाच्या १९३३ या हेल्पलाईनवर संपर्क केला तर अशा समाजविघातक कारवायांना आळा बसेल. आजच्या घडीला जर कोणी हे मादक पदार्थ बाळगले तर सापडलेल्या मादक पदार्थाच्या प्रमाणात एक ते वीस वर्षांची शिक्षेची तरतूद आहे. म्हणजे खुनाच्या शिक्षेपेक्षाही ही शिक्षा मोठी आहे. यावरून सरकार या बाबतीत किती गंभीर आहे हे कळते. तेव्हा प्रत्येकाने या बाबतीत समाज प्रबोधनासाठी पुढे यावे असेही आवाहन समीर वानखेडे यांनी केले. नंतर त्यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना समर्पक व दिलखुलास उत्तरे दिली.

कार्यक्रमाला उपस्थित कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनीही शाळा महाविद्यालयात नशामुक्ती अभियान राबविण्यात येईल अशी ग्वाही दिली. कार्यक्रमात शेवटी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

# पेण मधील स्वातंत्र्य सेनानींच्या स्मारक सुशोभिकरणास सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पेण मधील स्वातंत्र्य सेनानींच्या स्मारकाच्या शुशोभीकरणाला सुरुवात झाली झाली असून समस्त पेणवासीयांच्या वतीने माझं पेण संघटनेच्या पदाधिकारींनी पेण नगरपरिषद कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पेण मधील स्वातंत्र्य सेनानींचे स्मारक सुशोभित, आकर्षक व्हावे यासाठी पेण मधील सर्व पत्रकार, जेष्ठ नागरिक, विविध ग्रुप, माझं पेण यांच्या पाठ पुराव्याने एक भव्य, आकर्षक स्मारकाची निर्मिती होत आहे. यासाठी पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील व त्यांचे नगरपरिषदेतील सर्व सहकाऱ्यांचे पेण मधील नागरिकांच्या, सर्व पत्रकार, व सर्व ग्रुप यांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यासाठी नगरपरिषदेत प्रत्यक्ष माझं पेण च्या वतीने भेट घेऊन पत्र दिले. प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या सेनानीं च्या नावाची तहसील कार्यालयात असलेली अधिकृत यादी माझं पेण तर्फे ८ एप्रिल २०२४ रोजी नगरपरिषदेकडे देण्यात आली होती. ती सर्व नावे स्तंभावर यावीत आणि या उद्घाटनाच्या प्रसंगी या स्वातंत्र्य सेनानींच्या नातेवाईकांना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करावा तसेच स्मारकाच्या सभोवती पवित्रता कशी राखता येईल याबाबत काही सूचना दिल्या यावेळी दिल्या.

मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी सर्व सूचना योग्य असल्याचे सांगून तुम्हाला जेवढे समाधान आहे त्याही पेक्षा आम्ही हे सुंदर काम करतोय याचा आनंद आम्हाला असल्याचे मत व्यक्त केले. तसेच नागरिकांच्या योग्य सूचनांचे नेहमीच नगरपालिकेतर्फे स्वागतच केले जाते असे यावेळी त्यांनी सांगितले.

# अणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जीवनदीप खर्डी महाविद्यालयात गटचर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



खर्डी : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित खर्डी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी श्री रविंद्र घोडविंदे ( अध्यक्ष, जीवनदीप शैक्षणिक संस्था) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष गटचर्चेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागाच्या पुढाकाराने करण्यात आले होते. अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवास, साहित्यातील क्रांतिकारक भूमिका आणि सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने त्यांनी केलेले योगदान या बाबींवर चर्चा केंद्रित होती. विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंच्या कथांचे सादरीकरण, विचारांचे विश्लेषण आणि आजच्या समाजात त्यांची लेखनी किती प्रभावी ठरते, यावर आपली मते प्रभावीपणे मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अण्णाभाऊ साठे हे केवळ लेखक नव्हते, तर समाजमनाचे प्रतिबिंब होते, असे प्रतिपादन केले. प्रा. दिप्ती मोरे यांनी स्वागत व प्रस्तावना केली.

या गटचर्चेत विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि साहित्यप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. संदेश गायकवाड यांनी केले.

या गटचर्चेत प्रथम वर्ष कला शाखेचे विद्यार्थी कु. कासीम शरीफ शेख, कु. कुणाल शिवाजी घोडविंदे, कु. गौरव सुरेश वडवले या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची चर्चा केली.या गटचर्चेमुळे विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाचे व्यापक भान लाभले, अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

## आजचे राशि भविष्य

**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.नफा मिळविण्यासाठी तरी मदत घ्यावी लागेल.

**मिथुन**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कर्क**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**सिंह**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**कन्या**
वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**तूळ**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**धनु**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल. तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.

**मकर**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**कुंभ**
कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि पूर्ण होण्यास मदत होईल.

**मीन**
अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. आज तुम्हाला तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# जिल्हाधिकारी अशोक शिनगारे : लोकसेवेचा दीपस्तंभ

आज एका अशा प्रशासकाचा सेवानिवृत्तीनिमित्त निरोप समारंभ साजरा होत आहे, ज्यांनी आपल्या कार्याने केवळ प्रशासकीय क्षेत्रातच नव्हे, तर हजारो लोकांच्या हृदयात आदराचे स्थान निर्माण केले आहे.

जिल्हाधिकारी श्री.अशोक मंदोदरी अंबादासराव शिनगारे, हे नाव केवळ एक पद नाही, तर ते दूरदृष्टी, कार्यतत्परता, संवेदनशीलता आणि लोककल्याणासाठी सतत धडपडणाऱ्या एका व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहे. आज, दि.31 जुलै 2025 रोजी, ते त्यांच्या गौरवशाली प्रशासकीय सेवेतून निवृत्त होत असताना, त्यांच्या दीर्घ, कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकहितैषी प्रवासाचा यथोचित सन्मान करणे, हे आपले कर्तव्य आहे.

**अशोक शिनगारे: एक दूरदृष्टीचा प्रशासक**

श्री.अशोक शिनगारे यांचा जन्म दि.1 ऑगस्ट 1965 रोजी झाला. हा केवळ योगायोग नाही की, त्यांचा जन्मदिवस 'महसूल दिन' म्हणूनही साजरा होतो. त्यांच्या जीवनात कृषी क्षेत्राचे सखोल ज्ञान रुजले होते, कारण त्यांनी एम.एस.सी. ॲग्रीकल्चरमध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणाने त्यांना केवळ जमिनीशी जोडले नाही, तर मातीतील प्रत्येक कणाला न्याय देण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक निर्णयातून येत असे. ठाणे जिल्ह्याच्या प्रशासकीय प्रगतीची आधारशिला त्यांच्याच प्रयत्नांनी रचली गेली आहे, हे निश्चितपणे म्हणता येईल.

**गौरवशाली प्रशासकीय प्रवासाची सुरुवात..**

श्री.शिनगारे साहेबांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेचा प्रवास दि.7 ऑगस्ट 1993 रोजी कृषी विकास अधिकारी म्हणून सुरू झाला. या पदावर त्यांनी दि.30 एप्रिल 1994 पर्यंत काम केले. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होवून दि.23 मार्च 1994 रोजी त्यांची 'उपजिल्हाधिकारी' संवर्गात नियुक्ती झाली. ही त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील एक महत्त्वाची पायरी होती.

त्यांनी दि.2 मे 1994 ते दि.1 मे 1996 या कालावधीत उपजिल्हाधिकारी परिविक्षाधीन कालावधी म्हणून कामकाज पाहिले.

त्यानंतर दि.2 मे 1996 ते दि.3 नोव्हेंबर 1999 या कालावधीत त्यांनी हिंगोली, परभणी येथे उपविभागीय अधिकारी पदाची धुरा सांभाळली. या काळात त्यांनी ग्रामीण भागातील समस्या आणि लोकांच्या गरजा जवळून अनुभवल्या, ज्यामुळे त्यांची संवेदनशीलता अधिक वाढली.

**विविध महत्त्वाच्या पदांवरील ठसा**

श्री.शिनगारे साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर आपल्या पारदर्शक कार्याचा ठसा उमटवला.

दि.4 नोव्हेंबर 1999 ते 31 जानेवारी 2003 या कालावधीत ते माजी गृहनिर्माण मंत्री श्री. रोहिदास पाटील यांचे खाजगी सचिव होते.

त्यानंतर दि.1 फेब्रुवारी 2003 ते 17 फेब्रुवारी 2003 या काळात ते राज्यमंत्री, गृहे (शहरे) यांचे खाजगी सचिव म्हणूनही कार्यरत होते. या पदांवर काम करताना त्यांना उच्चस्तरीय प्रशासकीय निर्णयप्रक्रियेचा अनुभव मिळाला, ज्यामुळे त्यांची निर्णयक्षमता अधिकच विकसित झाली.

दि.25 एप्रिल 2003 ते 18 जून 2003 या कालावधीत त्यांनी उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे येथे उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी या पदाचे काम पाहिले. या काळात त्यांनी उल्हासनगरसारख्या गुंतागुंतीच्या शहरी भागातील समस्या हाताळल्या आणि प्रशासकीय कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले.

दि.7 जुलै 2003 रोजी त्यांना निवड श्रेणी उपजिल्हाधिकारी पदाचा लाभ मिळाला, ज्यामुळे त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीला आणखी गती मिळाली.

त्यानंतर दि.19 जून 2008 ते 31 जुलै 2012 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर या पदावर काम केले. मुंबईसारख्या महानगराचा प्रशासकीय अनुभव त्यांच्यासाठी महत्त्वाचा ठरला.

दि.31 जुलै 2012 ते 5 सप्टेंबर 2014 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, ठाणे (मुख्यालय जव्हार) या पदावर काम केले, जिथे त्यांना आदिवासी भागातील लोकांच्या अडचणी आणि त्यांच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची संधी मिळाली.

दि.6 सप्टेंबर 2014 ते 5 एप्रिल 2016 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, ठाणे या पदावर काम केले. या काळात ठाणे जिल्ह्याच्या प्रशासकीय यंत्रणेत त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या.

दि.6 एप्रिल 2016 ते 25 सप्टेंबर 2016 या कालावधीत त्यांनी अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोकण भवन, नवी मुंबई येथेही आपली सेवा बजावली, जिथे त्यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती आणि सर्वोच्च पदांवर कार्य**

त्यांच्या अथक परिश्रमाचे आणि प्रामाणिक कार्याचे फळ म्हणून, भारतीय प्रशासकीय सेवेत त्यांची पदोन्नती झाली. दि.26 सप्टेंबर 2016 ते 30 मे 2018 या कालावधीत त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिले. जिल्हा परिषदेच्या कारभारात त्यांनी पारदर्शकता आणली आणि ग्रामीण विकासाला गती दिली.

दि.31 मे 2018 ते 8 सप्टेंबर 2020 या कालावधीत त्यांनी सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई या पदाचा कार्यभार सांभाळला. सिडकोसारख्या मोठ्या विकास प्राधिकरणात काम करताना, त्यांनी शहरी नियोजनात आणि पायाभूत सुविधांच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

दि.9 सप्टेंबर 2020 ते 30 सप्टेंबर 2022 या कालावधीत त्यांनी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई म्हणून काम पाहिले. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.

दि.30 सप्टेंबर 2022 रोजी त्यांनी ठाणे जिल्हाधिकारी म्हणून तत्कालीन जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्याकडून पदभार स्वीकारला. ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांची कारकीर्द ही त्यांच्या प्रशासकीय प्रवासातील सुवर्णक्षण ठरली. त्यांनी ठाणे जिल्ह्याला प्रशासकीय शिस्त आणि विकासाच्या वाटेवर आणले. आणि आज, दि.31 जुलै 2025 रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत.

**जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या कार्यकाळातील प्रमुख उपलब्धी**

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या कार्यकाळात ठाणे जिल्ह्यात अनेक महत्त्वाचे बदल आणि विकासकामे झाली, ज्यामुळे जिल्ह्याच्या प्रगतीला गती मिळाली. त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख उपलब्धी:

मेट्रो कारशेडसाठी भूसंपादन: मेट्रो कारशेडसाठी जमिनीचे यशस्वी संपादन केले, ज्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढला नाही आणि 20 लाखांहून अधिक प्रवाशांना सुलभ प्रवासाचा मार्ग मोकळा झाला.

मुंबई मेट्रो मार्गिका क्र.4, 4अ, 10 व 11 या मेट्रो मार्गिकांच्या एकात्मिक कारशेड डेपोकरिता मौजे मोघरपाडा येथील स.न.30 मधील 174.01 हेक्टर आर क्षेत्राचा ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

मेट्रो कारशेड क्र.7अ व 9 च्या कारशेडकरिता मौजे डोंगरी येथील 59.79 हेक्टर आर क्षेत्राचा आगाऊ ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

मुंबई मेट्रो 12 कल्याण-तळोजा डेपोकरिता मौजे निळजे येथील 48.61 हेक्टर आर क्षेत्राचा आगाऊ ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

**बुलेट ट्रेन प्रकल्प:** ठाणे जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याची त्यांनी सक्रियपणे देखरेख केली.

**रेल्वे पायाभूत सुविधा विस्तार:** भारतीय रेल्वेच्या अंतर्गत जिल्ह्यात नवीन रेल्वे लाईन्स जोडण्यास पाठिंबा दिला, ज्यामुळे कनेक्टिव्हिटी आणि सेवा सुधारल्या.

**ईस्टर्न फ्रीवे विस्तार:** ईस्टर्न फ्री-वेच्या विस्तार कामावर त्यांनी लक्ष ठेवले, ज्यामुळे प्रदेशातील रस्ते जोडणी अधिक चांगली झाली.

**मेट्रो लाईन अंमलबजावणी :** जिल्ह्यातून जाणाऱ्या मेट्रो लाईन्सच्या अंमलबजावणीतील प्रमुख अडचणी त्यांनी दूर केल्या.

**किनारी रस्ता (कोस्टल रोड) आणि कॉरिडॉर प्रकल्प:** कोस्टल रोड आणि अनेक शहरी कॉरिडॉरसह मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीसाठी त्यांनी सुलभता आणली.

**नवीन सिव्हिल हॉस्पिटल:** ठाण्यात नवीन सिव्हिल हॉस्पिटलच्या बांधकामाला गती देण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, जे आता पूर्णत्वाकडे आहे.

**विकसित भारत संकल्प यात्रा:** जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ 81 हजार 44 नागरिकांना मिळाला.

**शासन आपल्या दारी:** राज्य शासनाच्या शासन आपल्या दारी या विशेष मोहिमेच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील 45 लाख 42 हजार 673 नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाला.

**नमो महारोजगार मेळावा:** नमो महारोजगार मेळाव्याकरिता 66 हजार 226 इच्छुकांनी नोंदणी केली होती. त्यातील 39 हजार 625 जणांनी मुलाखती दिल्या. त्यानुसार जिल्ह्यातील 17 हजार 519 उमेदवारांना त्याच दिवशी नोकरी देण्यात आली.

**मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना:** ठाणे जिल्ह्यातील पात्र महिलांना राज्य शासनाच्या मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला.

**दुर्गम भागात प्रमाणपत्र शिबिरे:** दुर्गम आणि वंचित भागांतील रहिवाशांना आवश्यक प्रमाणपत्रे देण्यासाठी मोबाईल शिबिरे सुरू केली आणि त्यांना प्रोत्साहन दिले.


**निर्यात वाढ:** विशेषतः क्षेत्रांनुसार केलेल्या हस्तक्षेपांमुळे जिल्ह्याची निर्यात उलाढाल रु.45 हजार कोटींवरून रु.53 हजार कोटींपर्यंत वाढवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

**शांततापूर्ण निवडणुका:** श्री.शिनगारे यांच्या कार्यकाळात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका शांततापूर्ण वातावरणात पार पडल्या. या निवडणुकांमध्ये कोणत्याही अनुचित घटना घडू नये याची त्यांनी खात्री केली.

**महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटींचे व्यवस्थापन:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटींसह अनेक उच्च-स्तरीय भेटींचे समन्वय साधला, ज्यामुळे नियोजन आणि अंमलबजावणी निर्दोष झाली.

**ठाणे-बोरीवली बोगदा प्रकल्प:** ठाणे-बोरिवली भूमिगत बोगदा प्रकल्पाला गती दिली, ज्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे.

**महासंस्कृती महोत्सव:** जिल्ह्यात दि.26 ते 30 जानेवारी 2024 या कालावधीत महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना महाराष्ट्रातील पर्यटन, लोककला, कोकणी कला आणि हस्तकला तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैभवशाली ठेव असलेल्या



किल्ल्यांची माहिती देण्यात आली.

**नागरिक समन्वय:** नागरी समस्या प्रभावीपणे सोडवण्यासाठी नगरपरिषदा आणि महानगरपालिकांशी श्री.शिनगारे यांनी जवळून समन्वय साधला.

**जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत निधी:** जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत विविध विभागांसाठी विकास निधी सक्रियपणे एकत्रित केला आणि वितरित केला.

**स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन:** जिल्ह्यातील स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कंपन्यांसोबत MoU करण्यात आले व त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्यात यशस्वी ठरले.

**महानाट्य शिवराज्याभिषेक:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या 350 व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त जिल्ह्यात "महानाट्य शिवराज्याभिषेक" सादर करण्यात आले. या महानाट्याकरिता दररोज साधारण 9 ते 10 हजार नागरिकांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना त्यांच्या या संपूर्ण कारकिर्दीत ठाणे जिल्ह्यातील प्रसारमाध्यम प्रतिनिधींनीदेखील अत्यंत मोलाची साथ दिली. प्रशासन अन् प्रसारमाध्यमे या दोन घटकांच्या सांघिक सहकार्याने ते सकारात्मकतेने व गतिमानाने कामकाज करू शकले.

**"मिस्टर परफेक्शनिस्ट": एक उपाधी नव्हे, तर जीवनशैली**

शिनगारे साहेबांच्या एकूण 32 वर्षांच्या शासकीय सेवेच्या कारकिर्दीत त्यांना खऱ्या अर्थाने "मिस्टर परफेक्शनिस्ट" ही उपाधी प्राप्त झाली आहे. ही उपाधी त्यांना केवळ शासकीय कारकिर्दीतच नव्हे तर त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनालाही तंतोतंत लागू होते. कोणत्याही विषयाचा अचूक आणि सखोल अभ्यास, कोणताही विषय झटकन समजून घेवून त्यावर अतिशय संतुलित (BALANCED) निर्णय घेणे, कितीही तणावग्रस्त परिस्थिती असली तरी शांत राहणे आणि समोरच्या व्यक्तीचे मन समजून घेणे, त्या व्यक्तीला न दुखावता त्याला मदत करणे या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे शिनगारे साहेब तळागाळातील सामान्य व्यक्तीपासून ते सर्वोच्च पदावरील व्यक्तींच्या मनात आदराची जागा निर्माण करू शकले.

## 'मिस्टर परफेक्शनिस्ट' अन माणूस म्हणून अढळ स्थान...!

– मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
ठाणे

त्यांच्या या गुणांमुळेच ते फक्त एक अधिकारी नव्हते, तर एक संवेदनशील, प्रेमळ आणि जिव्हाळ्याचे संबंध जपणारे व्यक्तिमत्व होते. आम्हा अधिकाऱ्यांसाठी ते नेहमीच एका मोठ्या बंधूंच्या भूमिकेतून एक आदर्श मार्गदर्शक ठरले. त्यांनी केलेले मार्गदर्शन आम्हा सर्वांसाठीच नेहमी पथदर्शी ठरले आहे, ज्यामुळे आमच्यात प्रशासकीय शिस्त, दैनंदिन कामात गतिमानता, गुणवत्तापूर्ण कामकाज, प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि वक्तशीरपणा असे सकारात्मक बदल घडले.

**एक यशस्वी 'कप्तान' आणि लोकसेवेचा आदर्श**

"TRUE LEADERS SPEAK WITH ACTION" या उक्तीप्रमाणे अशोक शिनगारे सर खरोखरीच प्रशासनातील एक लोकप्रिय आणि यशस्वी 'कप्तान' ठरले आहेत. त्यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा प्रशासनाने गुणवत्तापूर्ण प्रशासकीय कामकाज करण्यात यशाचा टप्पा गाठला. महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या सहवासात अनेक अधिकारी घडले. लोकसेवेचा वसा घेवून काम कसे करावे, याचा आदर्श वस्तुपाठच त्यांनी घालून दिला. वरिष्ठांचा सन्मान राखून, सर्वांना सोबत घेवून लोकहिताची कामे यशस्वीपणे मार्गी लावण्यात त्यांचे कौशल्य या ठाणे जिल्ह्याने पावलोपावली अनुभवले. सरांनी, आम्हाला दिलेली लोकसेवेची ही शिकवण आम्ही यापुढेही अशीच सुरु ठेवण्यासाठी कटिबद्ध राहू. हीच खरी आजच्या दिवशी त्यांना दिलेली गुरुदक्षिणा असेल.

श्री. शिनगारे साहेब केवळ एक उत्तम प्रशासकच नव्हते, तर ते एक उत्तम वक्ता आणि एक उत्तम व्यक्ती देखील होते. त्यांची भाषणे नेहमीच प्रेरणादायी असत, कारण ती केवळ शब्दांची नसते, तर त्यात अनुभवांचे, संवेदनशीलतेचे आणि लोककल्याणाच्या भावनेचे प्रतिबिंब असे.

**कुटुंबवत्सल व्यक्ती आणि माणूस म्हणून अढळ स्थान**

आदरणीय अशोक शिनगारे साहेबांमध्ये आम्ही सतत जनसेवेसाठी धडपडणारा जसा प्रशासक पाहिला, तसाच त्यांच्यात एक कुटुंबवत्सल, प्रेमळ, हळवा, मेहनती, मितभाषी कुटुंबप्रमुखही पाहिला. ही गोष्ट निश्चित आहे की, जो आपल्या कुटुंबाची सर्वार्थाने काळजी घेतो, आपल्या कुटुंबातील व्यक्तींचा आदर राखतो, ती व्यक्ती आपल्या प्रशासकीय सेवेतही त्याच पद्धतीने आपल्या सहकाऱ्यांची, संस्थेची, व्यवस्थेची मनापासून काळजी घेतो. आणि म्हणूनच अशी व्यक्ती सर्वांच्या मनात आपले अढळ स्थान प्राप्त करते.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे या 'माणसा'ने त्यांच्यातील माणुसकीने, आपल्या कर्तृत्वाने व गोड वागणुकीने असेच अढळ स्थान तुम्हा-आम्हा सर्वांच्याच मनात निर्विवादपणे मिळविले आहे. त्यांच्या निवृत्तीप्रसंगी, ठाणे जिल्ह्याचे भूषण डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह त्यांच्याविषयीच्या प्रेम आणि आदराखातर राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, वन मंत्री मा. गणेश नाईक साहेब, पर्यटन मंत्री मा. शंभूराज देसाई साहेब, परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक साहेब, माननीय लोकसभा सदस्य डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, सुरेश म्हात्रे, विधानपरिषद सदस्य निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड, रविंद्र चव्हाण, किसन कथोरे, दौलत दरोडा, श्रीमती मंदा म्हात्रे, संजय केळकर, डॉ. बालाजी किणीकर, कुमार आयलानी, शांताराम मोरे, महेश चौघुले, नरेंद्र मेहता, विश्वनाथ भोईर, रईस शेख, राजेश मोरे, श्रीमती सुलभा गायकवाड आणि कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी साहेब, विविध क्षेत्रातील अन्य मान्यवर, ठाणे जिल्हा प्रशासनातील सर्व शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! शिनगारे साहेबांच्या या प्रदीर्घ, यशस्वी आणि जनहितैषी प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आम्ही सर्वजण मनःपूर्वक धन्यवाद देतो आणि त्यांचे मनस्वी अभिनंदनही करतो. शिनगारे साहेबांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर आरोग्यदायी असे दीर्घायुष्य लाभो, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत, अशा आमच्या हार्दिक सदिच्छा...! त्यांच्या पुढील वाटचालीस (Next Innings) खूप खूप शुभेच्छा...!

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका पर्यावरण विभागाचा अभिनव उपक्रम

## – दुसऱ्या BIOCRUX रिव्हर्स वेंडिंग मशीनचे इन्स्टॉलेशन !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी आणखी एक पाऊल उचलण्यात आले आहे. काल सायंकाळी सिटी पार्क येथे दुसरी BIOCRUX रिव्हर्स वेंडिंग मशीन (प्लास्टिक बाटल्या नष्ट करणारी मशीन) बसविण्यात आली आहे. ही मशीन CSR निधीतून रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटी यांनी उपलब्ध करून दिली असून याचा एकूण खर्च सुमारे रु. ३ लाख आहे. या आधी पहिली मशीन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे बसविण्यात आली होती.



या मशीनचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापालिका उपआयुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटीचे अध्यक्ष सुरेश कल्याणकर, माजी अध्यक्ष प्रसांत पात्रो, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष धिरेन्द्र सिंह, माजी अध्यक्ष बिजू उन्नीथन, तसेच रोटरी सदस्य दिलीप घाडगे, रमेश मोरे, दीपक चौधरी आणि डॉ. अर्चना सोमानी उपस्थित होत्या.

ही मशीन इन्स्टॉल केल्यामुळे प्लास्टिक बाटल्या योग्य पद्धतीने नष्ट होतील पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल. हे मशीन CSR च्या माध्यमातून प्राप्त होण्यासाठी पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभागाच्या रोहिणी लोकरे यांनी पाठपुरावा केला होता.

तरी कल्याण पश्चिम येथील सिटी पार्कच्या निसर्गरम्य परिसरात फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी या सुविधेचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे 'पसायदान' पाठांतर स्पर्धा उत्साहात संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जिल्हा परिषद केंद्र शाळा, राहनाळ येथे इयत्ता पहिली ते चौथी व पाचवी ते सातवी अशा दोन गटांमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज रचित पसायदान या मंगलप्रार्थनेच्या पठणावर आधारित स्पर्धा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतरच नव्हे, तर त्यामागील अर्थपूर्णतेची प्रचिती दिली.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाच्या अखेरीस लिहिलेले पसायदान हे केवळ धार्मिक प्रार्थना नसून एक सार्वत्रिक कल्याणाची, शांतीची व सद्भावनेची प्रार्थना आहे. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, अभिवाचन कौशल्य व सांस्कृतिक जाणीवा वाढाव्यात, या उद्देशाने शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम तयारीसह सहभाग घेतला. लहान गटात (इ. १ ली ते ४ थी) आराध्या शिंदे हिने प्रथम क्रमांक, ईश्वरी नाईक हिने द्वितीय क्रमांक तर प्रियांशी कनोजिया हिने तृतीय क्रमांक मिळवला. मोठ्या गटात (इ. ५ वी ते ७ वी) राज राजभर याने प्रथम क्रमांक, श्रद्धा वरकड हिने द्वितीय क्रमांक, तर ऋषिकेश शिंदे याने तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेच्या परीक्षक म्हणून संध्या जगताप व रसिका पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे बारकाईने मूल्यांकन केले. त्यांनी विद्यार्थ्यांचे उच्चार, लय, स्पष्टता, भावपूर्ण अभिवाचन आणि आत्मीयता या निकषांवर गुणांकन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश ठाकरे व रविना पाटील यांनी करत उपस्थितांची मनं जिंकली. चित्रा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रजनी नाईक यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत शाळेच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक मूल्ये रुजवली गेली. केवळ पाठांतराच्या पलीकडे जाऊन 'सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करणे' ही संतपरंपरेची शिकवण विद्यार्थ्यांनी मनोमन आत्मसात केली. पालकांनाही शाळेतील या उपक्रमाचे कौतुक वाटले. पसायदान स्पर्धा ही विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी अध्यात्मिक शिक्षण होती. ज्यातून 'विश्वशांती, विवेकबुद्धी आणि सर्वांमध्ये समानतेची भावना' हा विचार रूजवला गेला.

# आमटेम येथे माता व गरजू महिलांना पौष्टिक पॅकेजचे वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमटेम येथे एस वाय एस या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांच्या मातांना व गावातील गरजू महिलांना पौष्टिक पॅकेज वाटण्यात आले.१५० पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांच्या माताना व गरजू महिलांना वाटप आले. त्याप्रसंगी एस वाय संस्थेचे सावंत मॅडम व इतर सदस्य तसेच आमटेम येथे काम करणाऱ्या एस ओ एस संस्थेच्या अनिताताई दिशा, निशा नेता, प्रतिभा सुषमा या सेविका उपस्थित होत्या. सर्वांचे स्वागत आभार महेंद्र पाटील यांनी केले व एस वो एस संस्था नेहमीच सर्वतोपरी या शाळेला गरीब गरजू महिला विद्यार्थी यांना मदत करत असते एवढेच काय तर शाळेच्या प्रत्येक हाकेला ओ देते असे गौरव उद्गार महेंद्र पाटील यांनी काढले.

# मुलांमधील वाढते नैराश्य व वाढती आत्महत्या ही चिंतेची बाब - सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आज समाजात एक भयानक वास्तव समोर येत आहे.लहान वयातच मुलांमध्ये नैराश्य वृद्धिंगत होत आहे. सर्वात दुःखद म्हणजे १८ वर्षाखालील मुलांमध्ये आत्महत्या करण्याचे धाडस होत आहे.हे आत्ता शहरापुरते मर्यादित न राहता त्याचे लोण ग्रामीण भागात पोहचले आहे या समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला तर अशी बाब निदर्शनास येते ती म्हणजे ,शिक्षणासाठीच्या स्पर्धा,वाढत्या पालकांच्या अपेक्षा ,समाजाचे वाढते दडपण या गोष्टी तर आहेतच,याशिवाय या मागे मूलभूत आणि एक अनाकलनीय कारण म्हणजे पालक आणि मुलांमध्ये संवादाचा अभाव ,प्रेमाची उणीव आणि भावनिक नात्याची तुटणारी साखळी ' त्यामुळे मुलांमधील ही चिंतेची बाब अतिशय धोकादायक असल्याचे मत वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी दिली

पूर्वीच्या काळातील आई बाबांचा ओरडण्याचा आवाज आत्ता काहीसा हळूवार होत चालला आहे. आत्ताचे पालक दोन्ही नोकरीत असल्याने त्यांना मुलांना वेळ द्यायला जमत नाही. जेवलास का?होमवर्क झाला का? क्लास ला गेला होतास का?एव्हढेच संभाषणाचे प्रश्न राहिलेत.संवाद नसल्याने मुलांच्या मनामध्ये साठणारे विचार,दुःख, चिंता कोणी ऐकत नाही. हीच एकाकीपणाची भावना नैराश्याचे बीज वाढायला कारणीभूत ठरत आहे.फक्त पालकांच्या अपेक्षा पण आपुलकीचा स्पर्श नाही. मुलांनी फक्त यशस्वी व्हावं यासाठीची धडपडत असतात. ही धडपड अनेकदा कठोर शिस्त,चांगले गुण ,स्पर्धेत आघाडी या गोष्टीवर केंद्रित असते प्रेम सहवास कौतुक याची जागा आत्ता दटावणी' ओरडा तुलना यांनी घेतली आहे.कधी कधी मुलांना वाटत मी आई बाबांसाठी काहीही करू शकणार नाही.येथेच त्याच्या आत्मसन्मानाची हत्या होते.

बघ शेजारच्या मुलांना कसे मार्क मिळतात, तू त्याच्या सारखा नाहीस,या आणि अशा वाक्यांनी त्याचे मन खचते.त्यांना स्वतःचा तिरस्कार वाटू लागतो.हीच तुलना त्याला नकोशी वाटू लागते. वास्तविक त्याची ही मनाची होणारी चलबिचल, दुःख व्यक्त करायला आई बाबापेक्षा कोणीही जवळचे नाही. त्याची चक्रव्युहात सापडल्यासारखी अवस्था होते. या सर्वच गोष्टींचा मुलांच्या मनावर ताण वाढतो.स्वतःबद्दलची नकारात्मक भावना वाढीस लागते .एकांतप्रियता,झोपेचा त्रास ,रडण ,खाण्यापिण्याची अनियमितता ,यामुळे शेवटी तो त्रस्त होऊन आत्महत्यांचे टोकाचे पाऊल उचलतो..महाराष्ट्रात ते प्रमाण सर्वात जास्त आहे ही सत्य परिस्थिती आहे.

पालकांनी आपल्या दैनंदिन वेळापत्रकात कमीतकमी १० ते १५ मिनिटे मुलांसाठी राखून ठेवावीत. त्याची शाळा,त्याचे मित्र त्याची हौस ,छंद,चिंता याकडे कुतुहलाने पहा. त्याला प्रोत्साहन द्या.एक आलिंगन द्या डोक्यावरून हात फिरवा ,तू छान आहेस ,तू हे नक्कीच करू शकशील,माझा पूर्ण विश्वास आहे,तुझा खरच अभिमान वाटतो. दुःख,भीती ,चिंता.या विषयी बोला. तुमचे बालपणीचे अनुभव सांगा. मदतीसाठी हात पुढे करा, यातून त्याच्यामध्ये नक्कीच सकारात्मक परिवर्तन घडून येईल.जर मुलांमध्ये काही वेगळे जाणवत असेल तर ,तणावाखाली दिसत असेल तर लाज न बाळगता मानसोपचार तज्ञांना दाखवा.बालपण हे कुसुमाप्रमाणे असते प्रेम, ऊब,चर्चा, आणि विश्वासाची गरज असते यातून काही सकारात्मक होत नसेल तर ते आपले फुल उमलण्याऐवजी कोमेजण्याची जास्त भीती असते.

आपुलकी,आपलेपणा ,प्रेम,हेच नैराश्यात प्रभावी औषध असते. आताच्या परिस्थितीत मुलांना त्यांचे ऐकणारा त्यांना समजून घेणारा, त्याच्याशी प्रेमाने वागणारा पालक पाहिजे.आताच्या काळात एक दोन अपत्य असतात ती देवाघरची फुले आपण जपली पाहिजे.आपण दूरदर्शनवर ,सोसियल मिडिया वर शाळकरी मुलांचे आत्महत्या करण्याचे लाइव्ह दृश्य पाहिल्यावर मन हळहळले, तेव्हा सर्वच पालकांनी सावध होऊन पाल्याकडे नेहेमीच लक्ष दिले पाहिजे अशी प्रांजल कबुली सीआर म्हात्रे यांनी दिली.



ठाणे • रविवार
•०३ ऑगस्ट २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# महिला बचत गटातील सदस्यांनी घेतले संविधानाचे धडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : भारतीय संविधानास 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभरात संविधान अमृत महोत्सव साजरा होत असून अमृत महोत्सवी संविधान पर्वाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली "घर घर संविधान" अभियान राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई संविधान साक्षर होण्याच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असून प्रथम टप्प्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रथमत: भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ऐरोली व न.मुं.म.पा मुख्यालय येथे संविधान साक्षर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 22 मे 2025 रोजी कै.अण्णासाहेब पाटील स्मृती भवन, कोपरखैरणे येथे परिमंडळ 2 विभाग व कोपरखैरणे विभाग येथील अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे 29 मे 2025 रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली येथे समाजविकास विभागातील सर्व समाजसेवक व समुहसंघटक आणि घणसोली, ऐरोली, दिघा विभाग कार्यालयामधील अधिकारी, कर्मचारी यांचेकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यापुढील टप्प्यात दि.30 जुलै 2025 रोजी न.मुं.म.पा. क्षेत्रामधील महिला बचत गटांत सक्रीय असलेल्या महिला कार्यकर्त्यांकरिता संविधान साक्षर कार्यशाळेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये बेलापूर ते दिघा अशा आठही विभागातील 97 महिला सदस्य सहभागी झाल्या होत्या. भारतीय संविधानाचे गाढे अभ्यासक श्री.सुरेश सांवत यांनी या महिलांना संविधानाचे मूल्य व अधिकार या विषयावर सोप्या भाषेत माहिती देत संविधानाचे महत्व विषद केले. यापुढील काळात विभागनिहाय महिला बचत गटांकरीता संविधान साक्षर कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत दक्ष रमेश नाईक ओबीसी गटातून रायगड जिल्ह्यात प्रथम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून गणला जातो शेतकरी सुखी झाला पाहिजे; त्याला अनेकदा निसर्गाच्या प्रकोपाला तर कधी पिकावर पडणाऱ्या रोगामुळे कष्टाने फुलवलेल्या शेतीमालावर पाणी सोडावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खात्यात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी सहा हजार रुपये वितरित केले जातात. २०१९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली आणि खूप कमी कालावधीत लोकप्रिय झाली. या योजनेचा २०वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून DBT मार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जारी करण्यात आला. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजा मध्ये प्रसिद्ध असलेले युट्युब याच्यामार्फत सर्व शेतकरी बांधवांची संवाद साधला. सदर कार्यक्रम २जुलै २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उपस्थित सर्व शेतकरी बांधव, अधिकारी, राजकीय व्यक्ती, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रोजेक्टरच्या साह्याने उपस्थित राहून पाहिला. या कार्यक्रम प्रसंगी कल्याण तालुक्यातील कृषी अधिकारी उपस्थित होते यांनी शेतकऱ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. आधुनिक शेतीकडे वळा, डिजिटल तंत्रज्ञान आत्मसात करून शेतीमध्ये त्याचा वापर करा, नवनवीन प्रकारची फळ शेती करा, अनुदानाचा लाभ घ्या इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती. श्री. रवींद्र घोडविंदे यांनी तरुणांना कृषी क्षेत्राकडे वळा, शेतीबद्दल सकारात्मक विचार करा, फुल शेती करा असे आव्हान केले. सदर कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. आशिष बाळगुडे (उपविभागीय कृषी अधिकारी कल्याण), मा.श्री सूर्यकांत कांबळे (तालुका कृषी अधिकारी कल्याण), मा.श्री रवींद्र घुडे (मंडळ कृषी अधिकारी कल्याण), मा. श्री अशोक गायकवाड (कृषी अधिकारी) तसेच श्री.अरविंद मिरकुटे (सरपंच दहागाव ),सौ प्रणिता टेंभे (सरपंच बापसई), श्री. दिलीप बुटेरे (सरपंच पोई), काशिनाथ चोरगे (ग्रामपंचायत सदस्य गोवेली), श्री. श्याम शिसवे श्री. मनोहर घारे, श्री. नरेश टेंभे हे उपस्थित होते. उपस्थित शेतकरी वर्ग, अधिकारी, राजकीय व्यक्तिमत्व ,सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थित हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# देशाच्या अर्थव्यवस्थेत कामगार वर्ग देखील महत्वाचा - प्रा. डॉ. प्रमोद हेरोडे

## संभाजीनगर येथे दोन दिवसीय प्रशिक्षण दौरा यशस्वीरित्या संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलदार वर्ग महत्त्वाचा आहे, तितकाच कामगार वर्ग देखील महत्त्वाचा आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे या कामगार वर्गाला पाहिजे तेवढं महत्त्व देताना दिसत नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा राजकीय पक्ष स्थापन करण्या अगोदर स्वतंत्र मजूर युनियनची स्थापना केली होती असे मत प्रा. डॉ. प्रमोद हेरोडे यांनी व्यक्त केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने रायबहादुर नारायण मेघाजी लोखंडे कामगार प्रशिक्षण केंद्र संभाजीनगर या ठिकाणी दोन दिवसीय प्रशिक्षण आणि अभ्यास दौरा आयोजित केला होता यावेळी ते बोलत होते.

या प्रशिक्षण आणि अभ्यास दौऱ्याचे आयोजन जयंती समितीचे अध्यक्ष संतोष हेरोडे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने विचार मंचावर उपस्थित कार्याध्यक्ष माजी महापौर डॉ. रमेश जाधव, संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पोळ, मिलिंद महाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रमोद हेरोडे, जयंती समिती अध्यक्ष संतोष हेरोडे, रवींद्र धन्वे, अतिरिक्त



कार्यकारी अभियंता, महावितरण ओव्हळ, उपकार्यकारी महावितरण डॉ.प्रदीप जगताप इत्यादी सह मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद हेरोडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था आणि संघटना यांच्या वतीने अभ्यास दौरा आणि प्रशिक्षण शिबिर यांचे आयोजन केल्याबद्दल संघटनेचे कौतुक केले.


ज्या पद्धतीने कामगारांच्या प्रश्नांना महत्त्व देत होते अगदी तसेच महत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजदूर युनियनला महत्त्व दिले निवडणूका लढले आणि जिंकले देखील. अशा विविध पैलू वरती त्यांनी भाष्य केले. यावेळी माजी महापौर रमेश जाधव यांनी देखील आपल्या अध्यक्षीय भाषणात

### कल्याण डोंबिवली महानगरपालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजन

कल्याण डोंबिवली महापालिकेत केलेल्या विधायक कामाची माहिती देताना दैनंदिन जीवनातील प्रवास सुरू करताना रिक्षावाला ते थेट महापौर पदापर्यंत कसे पोहोचले याची संघर्ष गाथा यावेळी व्यक्त केली. त्याचबरोबर उपस्थित मान्यवरांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्थेचे पदाधिकारी बाबासाहेब काकडे, नितीन रामराजे, राजू काऊतकर, संजीवनी पाटकर, पोर्णिमा कांबळे, गायकवाड, भाऊराव पंडित, हरिश्चंद्र जाधव, समाधान मोरे, बाळू शिंदे, अरुण भालेराव, श्रीकांत वाघमारे, नवनीत गायकवाड, नागेश ठोळ, दामोधर साळवे, सुनिल अंबाडे, डॉ. प्रदीप जगताप उपस्थित होते. अशा रीतीने हा यशस्वी रित्या अभ्यास दौरा आणि प्रशिक्षण संपन्न झाले. यावेळी सूत्रसंचालन समाधान मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनील अंबाडे यांनी केले.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



ईश्वराच्या, सदगुरूंच्या सेवेसाठी अनुकूल वेळेची वाट पाहू नका कोणताही क्षण सेवेसाठी अनुकूल असतो. सर्व काही ठीक असेल, काही अडचणी असणार नाहीत, तेव्हा मी सेवा करीन, असे समजणे म्हणजे अज्ञान होय. एक मनुष्य स्नान करण्यासाठी समुद्राच्या काठी गेला. पण स्नान न करता तेथेच बसून राहिला. लोकांनी त्याला विचारले, " तू इथे असा कसा बसला आहेस! स्नान केव्हा करणार?" तो म्हणाला, "समुद्राच्या लाटांमागे लाटा येत आहेत. त्या लाटा येणे बंद झाले, म्हणजे मी स्नान करीन." "काय? समुद्राच्या लाटा कधी बंद होतील काय?" लोकांनीच त्याला विचारले व मुर्खात काढले. संसार हाही एक समुद्रच आहे. त्यात अडचणीरुपी लाटा येणारच. पण म्हणून जर कोणी म्हणेल की अनुकूलता आल्यावर मी सदगुरू सेवा करीन, तर तशी सर्वांगीण अनुकूलता तर येणार नाहीत व वेळ मात्र निघून जाईल. जीवनात कितीही अडचणी येवोत. पण माणसाने एक गोष्ट विसरू नये, की मला भगवंताची प्राप्ती करून घ्यायची आहे. मला सदगुरुंशी एकरुप व्हायचे आहे.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा २० वा हप्ता जीवनदीपमधून वितरित





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून गणला जातो शेतकरी सुखी झाला पाहिजे; त्याला अनेकदा निसर्गाच्या प्रकोपाला तर कधी पिकावर पडणाऱ्या रोगामुळे कष्टाने फुलवलेल्या शेतीमालावर पाणी सोडावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खात्यात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी सहा हजार रुपये वितरित केले जातात. २०१९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली आणि खूप कमी कालावधीत लोकप्रिय झाली. या योजनेचा २०वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून DBT मार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जारी करण्यात आला. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजा मध्ये प्रसिद्ध असलेले युट्युब याच्यामार्फत सर्व शेतकरी बांधवांची संवाद साधला. सदर कार्यक्रम २जुलै २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उपस्थित सर्व शेतकरी बांधव, अधिकारी, राजकीय व्यक्ती, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रोजेक्टरच्या साह्याने उपस्थित राहून पाहिला. या कार्यक्रम प्रसंगी कल्याण तालुक्यातील कृषी अधिकारी उपस्थित होते यांनी शेतकऱ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. आधुनिक शेतीकडे वळा, डिजिटल तंत्रज्ञान आत्मसात करून शेतीमध्ये त्याचा वापर करा, नवनवीन प्रकारची फळ शेती करा, अनुदानाचा लाभ घ्या इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती. श्री. रवींद्र घोडविंदे यांनी तरुणांना कृषी क्षेत्राकडे वळा, शेतीबद्दल सकारात्मक विचार करा, फुल शेती करा असे आव्हान केले. सदर कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. आशिष बाळगुडे (उपविभागीय कृषी अधिकारी कल्याण), मा.श्री सूर्यकांत कांबळे (तालुका कृषी अधिकारी कल्याण), मा.श्री रवींद्र घुडे (मंडळ कृषी अधिकारी कल्याण), मा. श्री अशोक गायकवाड (कृषी अधिकारी) तसेच श्री.अरविंद मिरकुटे (सरपंच दहागाव ),सौ प्रणिता टेंभे (सरपंच बापसई), श्री. दिलीप बुटेरे (सरपंच पोई), काशिनाथ चोरगे (ग्रामपंचायत सदस्य गोवेली), श्री.श्याम शिसवे श्री. मनोहर घारे, श्री. नरेश टेंभे हे उपस्थित होते. उपस्थित शेतकरी वर्ग, अधिकारी, राजकीय व्यक्तिमत्व ,सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थित हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# कासा रिओ फेडरेशन निवडणूक प्रकरणी सहकारी न्यायालयात सुनावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कासा रिओ व कासा गोल्ड को-ऑप. हाउसिंग सोसायटीची निवडणूक ३ ऑगस्ट रोजी होणार आहे. या निवडणूकीस हरकत घेणारा अर्ज महेश पाटील यांनी ठाणे येथील सहकारी न्यायालयात दाखल केला आहे. या अर्जावर आज १ ऑगस्ट सुनावणी होणार होती, मात्र हि सुनावणी उद्या शनिवार २ ऑगस्ट रोजी होणार आहे. निवडणूक पारदर्शकपद्धतीने घेतली जावी अशी या अर्जाद्वारे पाटील यांनी मागणी केली आहे.

पाटील यांनी आरोप केला आहे की, फेडरेशनच्या निवडणूक प्रक्रियेत सभासदांना वेळेत माहिती दिली नाही, प्रतिनिधी यादी योग्य पद्धतीने प्रकाशित झाली नाही आणि निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक नाही. ३९ प्रतिनिधी सभासद असताना त्यातून २१ सदस्यांची मॅनेजिंग कमिटी तयार करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. जो स्पष्टपणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या विरोधात आहे. कायद्याप्रमाणे मॅनेजिंग कमिटीचे सदस्यसंख्येचे प्रमाण एकंदर जनरल बॉडीच्या तुलनेत मर्यादित असावे लागते. त्यामुळे या बाबतीत कायदेशीर वैधतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पाटील यांच्या अर्जाची दखल घेत सहकारी न्यायालयाने संबंधित फेडरेशनचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि संबंधित सोसायट्यांना नोटिसा पाठवून निवडणूक प्रक्रियेबाबत स्पष्टीकरण मागवले आहे. पाटील यांच्या अर्जावर उद्या २ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. सोसायटीच्या रहिवासियांच्या मते, निवडणूक कायदेशीर, पारदर्शक आणि सभासदांच्या अधिकारांचे रक्षण असावी. त्यामुळे उद्याच्या सुनावणीकडे सोसायटीचे लक्ष लागले आहे.

# कुकसे गृप ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंचपदी संगीता माने यांची निवड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व चांगले उत्पन्न असलेल्या कुकसे गृप ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी संगीता माने यांची निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळते सरपंच यांनी राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार एक खास सभा ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली यावेळी ग्रामपंचायत कामकाज सुरळीत चालावे याकरीता उपसरपंच पदावर कार्यरत असलेल्या संगीता राजु माने यांची भिंवडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने ग्रामपंचायत अधीकारी संजय जाधव यांनी प्रभारी सरपंच म्हणुन संगीता माने यांची निवड केली यावेळी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते तर प्रभारी सरपंच म्हणून निवड होताच पंचायत समितीचे माजी सभापती एकनाथ पाटील कुकसे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शाम भगवान पारधी शिवसेना उपतालूकाप्रमुख रघुनाथ पाटील सदस्य जागृती माघे शाखाप्रमुख दिपक पारधी शिवसेना सहकार सचिव बाळाराम कासार माजी सरपंच रोहिदास पाटील, अनंता पाटील, दिलीप पाटील, चेतन पाटील, ज्ञानेश्वर पाटील, सुभाष माघे, महेंद्र भोईर, रोहित भोईर, प्रफुल भोईर, जयेंद्र पारधी यांनी उपस्थित राहुन संगीता माने यांचे अभिनंदन केले.

# बापसई ग्रामपंचायतीकडून दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील बापस ई ग्रामपंचायत हद्दीत जलजन्य आजाराची साथ उद्भवली होती, परंतु दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांनी दिवसाचारात्र करुन ही साथ आटोक्यात आणली, त्यामुळे ग्रामस्थ मोठ्या संकटातून निभावून निघाले, यामुळे यातून उतराई व्हावे व या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती प्रणिता पांडुरंग टेंभे यांनी उपसरपंच, सदस्य या सर्वांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रात जावून वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांचा सन्मान केला, परंतु जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे हे याची दखल घेणार का? असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

कल्याण पंचायत समितीचे वैद्यकीय अधिकारी डॉ भारत मासाळ हे मुंबई येथे गेल्यानंतर हा पदभार डॉ पूनम जयकर यांच्या कडे आला, अगोदरच निळजे प्राथमिक आरोग्य केंद्राचे काही कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकारीश्री घुगे यांनी निंलबित केल्याने आरोग्य विभाग मोठ्या प्रमाणात बदनाम झाला होता, अशातच बापस ई ग्रामपंचायत हद्दीत दूषित पाण्यामुळे अतिसाराची साथ निर्माण झाली, गटविकास अधिकारी संजय भोये यांनी तातडीने वैद्यकीय अधिकारी डॉ



पूनम जयकर यांना याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या, त्यांनी रविवारी सुट्टी असताना देखील घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करून उपचार सुरू केले. डॉ दिलीपराज इंगळे, डॉ रेणू तिलकचंदाणी, डॉ कांचन घनशाणी,डॉ स्वाती चिवाणे, डॉ सायली जाधव, योगिता जाधव, दिपक शिर्के, संजय कांबळे, विजयालक्ष्मी शिंदे, कल्पना मोपे,राजेश्री साबळे, राजाराम निचिते, कैलास तालिकुटे, सूरज बडे, सुजित अडसुळे, हर्षदिप गव ई,गौरव सुरडकर, आणि सर्व आशा ग्रामपंचायत कर्मचारी पांडुरंग टेंभे या सर्वांनी दिवसरात्र मेहनत करून ही साथ आटोक्यात आणली, ऐवढेच नाही तर डॉ जयकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती, सुशोभीकरण केले, मनुष्यबळ कमी असताना देखील म्हारळ, वरप, कांबा, व इतर ठिकाणी आरोग्य समस्या निर्माण होणार नाहीत याची काळजी घेतली, बदनाम झालेल्या निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रास आमदार राजेश मोरे यांच्या कडून पत्र्याचे शेड बनवून घेतले, शिवाय त्यांना निक्षय मित्र बनवून सुमारे८०/१०० पेंशट दत्तक घेऊन त्यांना आहार वाटप केले, दहागाव पीएचसीला तहसीलदार, बीडिओ, मुख्य लेखा अधिकारी, तसेच सीईओ यांनी भेटी देऊन यांच्या कामाची प्रशंसा केली, तात्पुरता का होईना डॉ जयकर यांना तालुका वैद्यकीय अधिका-यांचा मिळालेला पदभार अंत्यत समर्थपणे यांनी सांभाळून दाखवला, अशा या कार्यतत्पर व कर्तव्यनिष्ठ वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी यासाठी बापस ई ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रणिता टेंभे, उपसरपंच अरुण गायकवाड, माझी उपसरपंच, कल्पना टेंभे, सुरेखा टेंभे, सदस्य मुक्ताबाई वाघे, सोमनाथ टेंभे, नरेश टेंभे, आणि ग्रामपंचायत अधिकारी सुप्रिया म्हारसे या सर्वांनी एकमताने निर्णय घेऊन दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात येवून शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, आशा वर्कर यांचा सन्मान केला, व भविष्यात अधिक चांगले काम करण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार संजय कांबळे यांनी ही आरोग्य विभागाचे कौतुक केले.

दरम्यान जिल्हा परिषदेचे कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ही आमच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करावे अशी भावना येथील ग्रामस्थांनी बोलून दाखविली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# जुलै महिन्यातील ८ निवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा नवी मुंबई महानगरपालिकेत सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : कोणत्याही आस्थापनेचा अधिकारी, कर्मचारी हा कणा असून नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांनी अगदी स्थापनेपासूनच चांगले काम केल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका नेहमीच प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहिली. असे अनुभवसंपन्न कर्मचारी सेवानिवृत्त होणे ही एक प्रकारे संस्थेची हानी असून सेव निवृत्त होणा-यांनाही महानगरपालिकेच्या कामाची, येथील सहका-यांची आठवण येत राहील अशा शब्दात मनोगत व्यक्त करीत अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांनी आपण सेवानिवृत्त होत असला तरी महानगरपालिकेचा एक घटक म्हणून, शहराचा एक नागरिक म्हणून आपले सक्रिय योगदान देत राहावे असे आवाहन केले.

नवी मुंबई महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त होणा-या 7 व स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या 1 अशा एकूण 8 अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या सेवानिवृत्ती सन्मान समारंभ प्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्यासह अतिक्रमण विभागाचे



उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, सहा.संचालक नगररचना श्री. सोमनाथ केकाण, अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे, विधी अधिकारी श्री. अभय जाधव तसेच अधिकारी, कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटूंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे, विधी अधिकारी श्री. अभय जाधव व अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या निवृत्त होणा-या सहका-यांसमवेत काम करतानाचे अनुभव सांगितले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नवी मुंबई महानगरपालिका सेवेतून जुलै महिन्यात निवृत्त होणारे लेखा अधिकारी श्री. मारुती शिंदे, उपअभियंता श्री. अविनाश जाधव, सहा.लेखा अधिकारी श्री. रविकांत खरात, प्राथमिक शिक्षिका श्रीम.अलका पवार, उच्चश्रेणी लघुलेखक श्री. राजेंद्र देशमुख, माहिती नोंदणीकार श्रीम. माधुरी नागरे, व्रणोपचारक श्री. संजय चव्हाण तसेच स्वेच्छानिवृत्ती स्विकारणा-या सिस्टर इनचार्ज श्रीम. सरोज साळसकर अशा 8 अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.